महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे
दुसरा व तिसरा मजला,नविन प्रशासकीय इमारत,विधान भवन समोर, कॅम्प,पुणे - १
दूरध्वनी क्र. ०२०-२६०५०००६ Email ID :dlrmah.mah@nic.in Web site :https://mahabhumi.gov.in

वाचा:- ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक दिनांक २२/०२/२०१९

---

क्र./गांवठाण/परिपत्रक/कावि.४२०/२०२२ पुणे दिनांक:-२७/०५/२०२२

# परिपत्रक

विषय :गांवठाण जमाबंदी प्रकल्प "स्वामित्व" योजना.
चौकशी नोंदवही व नकाशे ग्रामपंचायत कार्यालयास उपलब्ध् करुन देणेबाबत.

महाराष्ट्र राज्यातील ज्या गावांचे गावठाण भूमापन होऊन नकाशे व अधीकार अभीलेख तयार झालेले आहेत, अशा गावांच्या गावठाणांतील मिळकतींचे ड्रोन द्वारे भूमापन करुन मिळकत पत्रिका व सनदा तयार करणे कामी उपरोक्त वाचा सदरी नमुद शासन निर्णयान्वये मंजूरी देणेत आली आहे. आता सदर योजना केंद्रीय क्षेत्र योजने अंतर्गत स्वामित्व योजना महाराष्ट्रात राबविली जात आहे.

गांवठाण जमाबंदी प्रकल्प "स्वामित्व" योजने अंतर्गत करावयाच्या कामासाठी केंद्र व राज्य शासनाचे ग्राम विकास विभागाकडून निधी पुरवीला जातो.या योजने अंतर्गत चौकशी नोंदवही,नकाशे,मिळकत पत्रिका व सनदा इत्यादी महत्वाचे अभीलेख होतात. राज्य शासनाचे ग्राम विकास विभागाकडून निधी पुरवीणेत येत असलेने ग्रामपंचायत कार्यालयास नकाशे व चौकशी नोंदवहया उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन होती. यावर सांगोपांग विचार करुन खालील प्रमाणे सूचना निर्गमित करणेत येत आहेत.

ज्या गावांचे गांवठाण जमाबंदी प्रकल्प "स्वामित्व" योजने अंतर्गत गावठाण भूमापनाचे काम पूर्ण होऊन गांव परिरक्षणास घेतले आहे, अशा गावांचे नगर/ गांवठाण भूमापन नकाशे व चौकशी नोंदवहयांची एक प्रत संबधीत ग्रामपंचायतीस विनामूल्य उपलब्ध करुन देणेत यावी.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करावयाची आहे.

Signed by Niranjan K
Sudhansu
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
Reason: Approved
भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे
दुसरा व तिसरा मजला,नविन प्रशासकीय इमारत,विधान भवन समोर, कॅम्प,पुणे - १
दूरध्वनी क्र. ०२०-२६०५०००६ Email ID :dlrmah.mah@nic.in Web site :https://mahabhumi.gov.in

वाचा:- ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक दिनांक २२/०२/२०१९

क्र./गाजप्र /चौकशी/प्रसिध्दी/कावी.४२१/२०२२ पुणे,दिनांक: -२७/०५/२०२२

# परिपत्रक

विषय :गांवठाण जमाबंदी प्रकल्प स्वामित्व योजना.
चौकशी नोंदवही व नकाशे ग्रामपंचायत कार्यालयास उपलब्ध् करुन देणेबाबत.

महाराष्ट्र राज्यातील ज्या गावांचे गावठाण भूमापन होऊन नकाशे व अधीकार अभीलेख तयार झालेले आहेत, अशा गावांच्या गावठाणांतील मिळकतींचे ड्रोन द्वारे भूमापन करुन मिळकत पत्रिका व सनदा तयार करणे कामी उपरोक्त वाचा सदरी नमुद शासन निर्णयान्वये मंजूरी देणेत आली आहे. आता सदर योजना केंद्रीय क्षेत्र योजने अंतर्गत स्वामित्व योजना महाराष्ट्रात राबविली जात आहे.

गांवठाण जमाबंदी प्रकल्प स्वामित्व योजने अंतर्गत चौकशी नोंदवही,नकाशे,मिळकत पत्रिका व सनदा इत्यादी महत्वाचे अभीलेख होतात. ज्या गावांचे गांवठाण भूमापनाचे काम पूर्ण झाले आहे,अशा गावांचे योजनेअंतर्गत तयार झालेले नकाशे,चौकशी नोंदवही,मिळ तपत्रिका सनदा तपासल्या असता त्यामध्ये काही त्रुटी उणीवा आढळून आलेल्या आहेत. त्रुटी उणीवा भविष्यात राहू नये,अचूक अभीलेख तयार व्हावेत या उददेशाने मार्गदर्शक सूचना देणेची बाब विचाराधीन होती. यावर सांगोपांग विचार करुन खालील प्रमाणे सूचना निर्गमित करणेत येत आहेत.

**ज्या गावांचे गांवठाण भूमापनाचे काम चालू आहे अथवा चालू होणार आहे:-**

१.गांवठाण भूमापन व चौकशीचे काम पूर्ण झालेनंतर तयार झालेले प्रारुप नकाशे व चौकशी नोंदवहीचे गावाच्या चावडीवर,सार्वजनीक ठिकाणी सात दिवसाच्या कालावधी साठी प्रसिध्द करावे. गावी प्रारुप नकाशे व चौकशी नोंदवही प्रसिध्द केलेबाबतचा पंचनाम करणेत यावा. व काही हरकती,सूचना आल्यास त्या संबधीत उप अधीक्षक भू मी अभीलेख कार्यालयास लेखी स्वरुपात ग्रामसेवक/तलाठी मार्फत जमा कराव्यात.अशा सूचना प्रसिध्दीपत्रकात व दवंडीमध्ये देण्यात याव्यात.

२. प्रसिध्दची सूचना गावामध्ये दवंडी द्वारे व प्रसिध्दी पत्रकाद्वारे देणेत यावी. दवंडी रिपोर्ट विहीत नमुन्यात घेणेत यावा.

३.प्रसिध्दीच्या कालावधीमध्ये काही हरकती,सूचना आल्यास त्या संबधीत चौकशी अधीका-याकडे उप अधीक्षक भूमी अभीलेख कार्यालयाने पाठवाव्यात.

४.चौकशी अधीका-याने प्राप्त हरकतींची प्रचलीत नियमप्रमाणे चौकशी करुन योग्य तो निर्णय पारीत करावा.त्या संबधीचा तपशील चौकशी नोंदवहीच्या संबधीत रकान्यात नमुद करावा.

५.निर्णयाअंती चौकशी नोंदवही व अधीकार अभीलेखामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या,दुरुस्तीच्या टीपा चौकशी नोंदवहीच्या शेरा कॉलममध्ये ठेवून कराव्यात.